# तिफण

वर्ष : १४ वे । अंक ४ था
जानेवारी-फेब्रुवारी-मार्च - २०२३
ISSN 2231-573X
UGC Care Listed Journal



## यशवंतराव चव्हाण
### विशेषांक

साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक

# तिफण

वर्ष १४ वे, अंक - ४ था

जानेवारी - फेब्रुवारी - मार्च २०२३

भाग - १

**UGC Care Listed Journal**
**ISSN 2231 - 573X**

◆ संपादक ◆

डॉ. शिवाजी हुसे

पत्ता : संपादक, तिफण, 'शिवार' श्रीराम कॉलनी, हिवरखेडा रोड,
कन्नड, जि. औरंगाबाद - ४३११०३, मो. ९९०४००३९९८

# भाग - १ अनुक्रमणिका


| अनु क्र. | लेख व लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | चरित्र संपन्न व्यक्तिमत्व यशवंतराव<br>**प्रा. डॉ. भानुसे कारभारी लक्ष्मण** | १-५ |
| २ | आधुनिक महाराष्ट्राच्या निर्मितीचे शिल्पकार : यशवंतराव चव्हाण<br>**बालाजी गंगावणे** | ६-११ |
| ३ | यशवंतराव चव्हाण यांचे बहुआयामी कारकीर्द : एक अभ्यास<br>**प्रा. डॉ. गोवर्धन कृष्णाहरी दिकोंडा** | १२-१५ |
| ४ | यशवंतराव चव्हाण व्यक्ती आणि विचार<br>**प्रा. डॉ. गीतांजली बी. भोराडे** | १६-२० |
| ५ | यशवंतराव चव्हाण : एक प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व<br>**डॉ. संजय जीवनलाल सिंगनजुडे** | २१-२७ |
| ६ | यशवंतराव चव्हाण यांच्या बहुआयामी व्यक्तिमत्वाचा अभ्यास<br>**डॉ. अंकुश रामचंद्र बनसोडे** | २८-३३ |
| ७ | ज्ञानमंदिरे उभारणारा नेता : यशवंतराव चव्हाण<br>**प्रा. डॉ. दिवेकर रेश्मा रमेश** | ३४-३७ |
| ८ | आधुनिक महाराष्ट्राच्या उभारणीत यशवंतराव चव्हाण यांचे सामाजिक योगदान<br>**प्रा. डॉ. चांगुणा विठ्ठल कदम** | ३८-४४ |
| ९ | आधुनिक महाराष्ट्राच्या उभारणीत यशवंतराव चव्हाण यांचे योगदान<br>**डॉ. दत्तात्रय पांडुरंग खराडे** | ४५-४९ |
| १० | यशवंतराव चव्हाण - कुशल प्रशासक<br>**डॉ. गणेश बालासाहेब बनसोडे**<br>**डॉ. एन. बी. आघाव** | ५०-५३ |
| ११ | यशवंतराव चव्हाण यांच्या विचार व कार्याचा ऐतिहासिक वारसा<br>**डॉ. एस. आर. कट्टीमनी** | ५४-५९ |
| १२ | आधुनिक महाराष्ट्राच्या उभारणीत यशवंतराव चव्हाण यांचे शैक्षणिक योगदान<br>**प्रा. डॉ. साळुंखे यु. ए.**<br>**श्री. अतुल शहाजी देशमुख** | ६०-६३ |

# ११. यशवंतराव चव्हाण यांच्या विचार व कार्यांचा ऐतिहासिक वारसा



**डॉ. एस. आर. कट्टीमनी**
सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग प्रमुख, विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त)
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर संलग्नीत.

**घोषवारा**

महाराष्ट्राची अस्मिता जपणारे व भारताच्या सामाजिक, राजकीय, आर्थिक व सांस्कृतिक इतिहासात आपल्या कार्याचा वेगळा ठसा उमठवणारे अनेक लोकनेते या महाराष्ट्रात होऊन गेले. यामध्ये लोकमान्य टिळक, नामदार गोखले यशवंतराव चव्हाण यांचा समावेश होतो. १९४५ च्या सुमारास राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर काही महत्त्वपूर्ण घटना घडल्या. यामध्ये दुसरे महायुद्ध, शीतयुद्ध, भारत- पाकिस्तान फाळणी, निर्वासितांचे स्थलांतर, महात्मा गांधींची हत्या यासारख्या घटनांचे भारतीय समाज मनावर दीर्घकालीन परिणाम झाले. तसेच भारताच्या सामाजिक, राजकीय, आर्थिक, धार्मिक, शैक्षणिक, साहित्यिक व सांस्कृतिक जीवनातील संदर्भही बदलले.

महाराष्ट्राच्या व भारताच्या राजकारणात स्वतःचे वेगळे स्थान यशवंतराव चव्हाण यांनी निर्माण केले. महाराष्ट्रातील एका लहानशा खेड्यात सर्वसामान्य गरीब कुटुंबात जन्मलेली व्यक्ती जगाच्या कानाकोपऱ्यात जाऊन पोहोचली. यशवंतराव चव्हाण एक व्यक्ती नसून विचारधारा आहे. यशवंतराव चव्हाण हे एक संयमी, सहिष्णू व आदर्श व्यक्ती होते. ते एक प्रभावशाली वक्ते, मुत्सद्दी राजकारणी तसेच साहित्य व कलेचा रसिक आणि गुणग्राहक नेता म्हणून त्यांची ख्याती होती. राजकारणात राहून देखील त्यांनी स्वतःचे असे वेगळे साहित्यिक अस्तित्व निर्माण केले. प्रस्तुत शोधनिबंधाच्या माध्यमातून यशवंतराव चव्हाण यांच्या विचार व कार्याचा ऐतिहासिक वारश्याचे विवेचन करण्यात आले आहे.

**कळीचे मुद्दे**

अस्मिता, लोकनेते, शीतयुद्ध, निर्वासितांचे स्थलांतर, विचारधारा, गुणग्राहक नेता, साहित्यिक अस्तित्व...

**प्रस्तावना**

यशवंतराव चव्हाण यांचा जन्म १२ मार्च १९१४ रोजी देवराष्ट्रे, ता. खानापूर, जिल्हा सांगली येथे एका गरीब व अशिक्षित कुटुंबात झाला. त्यांचे शिक्षण देवराष्ट्रे, कराड व कोल्हापूर या ठिकाणी झाले. अतिशय प्रतिकूल परिस्थितीमध्ये त्यांनी बी.ए., एल.एल.बी पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. यशवंतराव चव्हाण हे १९४१ साली कायद्याची परीक्षा उत्तीर्ण झाले, परंतु वकिलीकडे लक्ष न देता सातारा जिल्ह्याच्या राजकारणाची धुरा त्यांनी आपल्या खांद्यावर घेतली. महात्मा फुले यांचे चरित्र वाचून यशवंतरावांच्या विचारांची जडणघडण झाली. वडील बंधू गणपतराव हे भाऊसाहेब कळंबे या क्रांतिकारक व सत्यशोधक चळवळीशी संबंध

असलेल्या वैचारिक प्रभावाखाली घडलेले होते. त्यामुळे सत्यशोधकीय व ब्राह्मणेतर चळवळींचे संस्कार त्यांच्या मनावर नकळतच होत गेले.

वयाच्या सोळाव्या वर्षी त्यांनी भारताच्या स्वातंत्र्यसंग्रामामध्ये सहभाग घेतला. १९३० साली महात्मा गांधीजींनी सुरू केलेल्या ब्रिटिश सरकारविरोधी सविनय कायदेभंग चळवळीमध्ये त्यांनी सहभाग घेतला. याच काळात त्यांना पहिला राजकीय कारावास १९३२ मध्ये घडला. या कारावासाच्या काळात त्यांनी कार्ल मार्क्स व मानवेंद्रनाथ रॉय यांच्या तत्त्वज्ञानाचा अभ्यास केला. त्यांच्या विचारांचा यशवंतरावांवर प्रभाव पडला.

१९४२ च्या भारत छोडो या अखेरच्या आंदोलनात यशवंतराव चव्हाण यांनी सातारा जिल्ह्याचे नेतृत्त्व केले. याच काळात भूमिगतांचे नेतृत्व महाराष्ट्रात सुरु झाले होते. भूमिगत राहून कार्य केल्यामुळे ते पकडले गेले. त्यांना तुरुंगवासाची शिक्षा झाली. १९४६ मध्ये मुंबई प्रांतांच्या विधिमंडळाची निवडणूक होऊन त्यात ते काँग्रेसचे उमेदवार म्हणून निवडून आले व संसदीय सचिव म्हणून ही त्यांची नियुक्ती यावेळी करण्यात आली. १९५२ च्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीत यशवंतरावांची मुंबई प्रांताच्या विधानसभेवर सदस्य म्हणून निवड झाली व ते मंत्री झाले. १९५२ ते १९५६ या काळात त्यांनी राज्याच्या मंत्रिमंडळाचे सदस्य म्हणून काम पाहिले. १९५७ मध्ये महाराष्ट्र व गुजरात या द्वैभाषिक मुंबई राज्याचे ते मुख्यमंत्री बनले. स्वातंत्र्यपूर्व काळात जे अखेरचे नेते महाराष्ट्रात झाले त्यामध्ये सर्वात तरुण नेतृत्त्व यशवंतराव चव्हाण हे होत.

**यशवंतराव चव्हाण यांचा राजकीय प्रवास**

१९६२ मध्ये केंद्रीय मंत्रिमंडळात संरक्षण मंत्री म्हणून त्यांची नियुक्ती झाली. यानंतर अर्थ व गृह अशा महत्त्वपूर्ण खात्यांची जबाबदारी त्यांनी भूषवली. १९७७ साली केंद्रामध्ये जनता पक्ष सत्तेवर आल्यावर यशवंतराव चव्हाण यांचे संसदेतील विरोधी पक्षाचे नेते म्हणून निवड झाली. १९७९ मध्ये केंद्रात चौधरी चरणसिंगाच्या मंत्रिमंडळात ते उपपंतप्रधान बनले. भारताच्या आठव्या वित्त आयोगाचे अध्यक्ष म्हणूनही त्यांची नियुक्ती झाली होती.

**भाषावार प्रांतरचना**

१५ ऑगस्ट, १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला. स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटिशांनी भारतीय संस्थानांना खालसा करून ब्रिटिश साम्राज्यास जोडले. ब्रिटिशांच्या एकसंघ साम्राज्यामुळे भारतीयांमध्ये राष्ट्रवादाची अस्मिता निर्माण झाली. तसेच स्वभाषा, स्वदेश, इतिहास व भारतीय संस्कृती याबद्दल आदर निर्माण झाला. भारत स्वतंत्र झाल्यानंतर भाषावार प्रांतरचनेनुसार राष्ट्रीय एकता प्रस्थापित करण्यासाठी काँग्रेसने अथक प्रयत्न केले.

फाजल अली कमिशनच्या शिफारशींनुसार विशाल मुंबई राज्य निर्मिती करण्याचा केंद्र शासनाचा विचार होता. तत्कालीन विविध राज्यांमध्ये विखुरलेल्या मराठी जनतेचे स्वतंत्र व सार्वभौम राज्य असावे ही मराठी जनतेची इच्छा होती. म्हणूनच सर्वपक्षीय समिती स्थापन करून केंद्र सरकार विरुद्ध आंदोलन केले गेले. महाराष्ट्रातील काँग्रेस पक्षाची परिस्थिती मात्र दयनीय झाली होती. सर्वपक्षीय समितीमध्ये सामील होऊन आंदोलन करायचे झाले तर पक्षाच्या धोरणाविरुद्ध व नेतृत्त्वाविरुद्ध बंड झाले असते. तसेच सर्वपक्षीय समितीमध्ये सामील न झाल्यास मराठी भाषिकांचे राज्य मिळणे अशक्यच वाटत होते.

मोरारजी देसाई संयुक्त महाराष्ट्राच्या विरोधात होते. यशवंतराव चव्हाण हे मराठी भाषिकांच्या एकत्रित राज्याचे समर्थक होते. परंतु फलटण येथील एका जाहीर सभेमध्ये "महाराष्ट्रापेक्षा नेहरू मोठे (म्हणजे देश मोठा) आम्ही नेहरूजींच्या नेतृत्त्वाखाली राहू" अशी भूमिका त्यांनी जाहीर केल्यामुळे गदारोळ माजला त्यांच्यावर महाराष्ट्र द्रोहाचे आरोप - प्रत्यारोप झाले. परंतु यशवंतराव चव्हाण हे आपल्या भूमिकेवर ठाम राहिले. यशवंतराव चव्हाण यांनी संयुक्त महाराष्ट्रासाठी मुत्सद्दीगिरीचे धोरण अवलबले. यशवंतरावांनी राजीनामा न देणे, कॉंग्रेस न मोडणे, नेहरूंचा विश्वास मिळवणे या आपल्या भूमिकेशी ते ठाम राहिले कारण त्यांच्या मते संसद ही सर्वश्रेष्ठ असून अंतिम निर्णय तेथे होणार आहे त्या दृष्टीने संयुक्त महाराष्ट्रासाठी ते प्रयत्नशील राहिले.

महाराष्ट्रभर दौरा काढून आपले विचार त्यांनी कार्यकर्त्यांसमोर मांडले. पूर्व खानदेशच्या कार्यकर्त्यांसमोर यशवंतराव चव्हाण यांनी एकसंघ महाराष्ट्राबाबत आपली भूमिका व विचार मांडताना ते म्हणाले,"गैरसमज असो अथवा अविश्वासामुळे असो आपले म्हणणे जर राष्ट्रीय नेते मान्य करत नसतील तर त्यांच्यावर न रागावता, किंवा त्यांच्या विरोधात न जाता, त्यांचा आपल्याबद्दलचा गैरसमज व अविश्वास आपल्या कृतीने दूर करूनच आपण त्यांचे मन वळवले पाहिजे, त्यांना जिंकले पाहिजे. आणि मला विश्वास वाटतो की ह्याच पद्धतीने मराठी भाषकांचे राज्य आपण मिळवू शकू. म्हणून माझ्या भूमिकेत महाराष्ट्र द्रोह नाहीच." पुढील काळात घडलेल्या घटनांवरून यशवंतराव चव्हाण यांचे विचार व कृती किती योग्य होती हे स्पष्ट झाले. १९५७ च्या विधानसभेच्या निवडणुकामध्ये महाराष्ट्रामध्ये कॉंग्रेस व यशवंतराव चव्हाण यांच्या विरोधात वातावरण तापलेले असतानाही यशवंतरावांची एकमताने पक्षनेतेपदी पुन्हा निवड झाली.

**संयुक्त महाराष्ट्र चळवळ**

१ नोव्हेंबर १९५६ रोजी द्वैभाषिक मुंबई राज्याची निर्मिती झाली. यशवंतराव चव्हाण हे या द्वैभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्री झाले. परंतु याच काळामध्ये संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन सुरू होते. भव्य मोर्चे, सभा, हरताळ व निदर्शने या सर्व बाबींमुळे पुरोगामी महाराष्ट्रामध्ये प्रचंड राजकीय उलथापालथ सुरू होती. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीमध्ये १०५ हौतात्म्यांचे बळी गेले. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीबाबत साशंक व विरोधी असणाऱ्या पंडित नेहरूंना यशवंतराव चव्हाण यांनी पटवून दिले की, गुजराती, मराठी व कानडी या तीन भाषिक जनतेच्या नेत्यांची एका राज्यात राहून मनापासून सहकार्याने काम करण्याची तयारी नाही. तसेच यापुढील सार्वत्रिक निवडणुकीत कॉंग्रेसचे राज्य महाराष्ट्रात आणि गुजरातमध्ये येऊ शकणार नाही व कॉंग्रेस या दोन्ही राज्यात पराभूत होईल असे पटवून दिले. वऱ्हाड, मराठवाडा आणि कोकणसह उत्तर-दक्षिण महाराष्ट्र हे मराठी भाषिक राज्य स्थापन करण्याचे विधेयक लोकसभेने आणि राज्यसभेने स्वीकारले आणि १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची यशवंतराव चव्हाण यांच्या नेतृत्त्वाखाली स्थापना झाली. थोडक्यात, १९५६ पासून ते १९६२ पर्यंतच्या सहा वर्षाच्या कारकिर्दीत यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्राच्या सर्वांगीण शाश्वत विकासाचा पाया घातला.

**यशवंतराव चव्हाण यांचे शैक्षणिक कार्य**

उदयोन्मुख महाराष्ट्राच्या विकासामध्ये शिक्षणाचे महत्त्व लक्षात घेऊन तळागाळातील वंचितांना शिक्षणाचे द्वार उघडण्याचे महान कार्य यशवंतरावांनी केले. गाव तेथे प्राथमिक शाळा, मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण तसेच खाजगी संस्थांना अनुदान देऊन

शाळा उघडण्याची परवानगी दिल्याने महाराष्ट्रामध्ये शिक्षणाचा प्रसार झपाट्याने झाला. यशवंतराव चव्हाण यांनी १९६० मध्ये पुणे येथे एस.एस.सी बोर्डाची स्थापना केली.

जीवराज मेहता अर्थमंत्री असताना व बाळासाहेब देसाई हे शिक्षण मंत्री असताना आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण देण्याची सवलत मंजूर झाली व वार्षिक ९०० हून अधिक कमी उत्पन्न असलेल्या पालकांच्या मुलांना फी सवलती व शिष्यवृत्ती चालू केल्या. यशवंतरावांच्या काळात औरंगाबाद व कोल्हापूर येथे विद्यापीठ स्थापन झाले. औरंगाबाद कराड व नागपूर येथे अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू करण्यात यशवंतरावाचा पुढाकार होता.

**सामाजिक सवलतींबाबतचा मंत्रिमंडळातील संघर्ष**

१४ ऑक्टोबर १९५६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी आपल्या लाखो अनुयायांसह हिंदू धर्म सोडून बौद्ध धर्माचा स्वीकार केला. १९५८ च्या काळात मंत्रिमंडळासमोर एक प्रश्न आला की, मागासवर्गीयांना अनुसूचित जाती म्हणून घटनेनुसार मिळत असलेल्या सवलती द्यायच्या का? घटनेनुसार तसे सरकारवर बंधन नव्हते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा काँग्रेस विरोध व धर्मांतराच्या प्रक्षोभक निर्णयामुळे त्यावेळच्या मंत्रिमंडळात त्यांच्या भूमिकेबद्दल नाराजी निर्माण झाली होती. त्यावेळी बहुसंख्य सदस्य सवलती चालू ठेवण्याच्या विरोधात दिसून आले. परंतु यशवंतराव चव्हाण मात्र सवलती चालू ठेवण्याच्या मतावर ठाम होते. ते म्हणाले, धर्म बदल झाला म्हणून लगेचच मागासलेपण गेले असे होत नाही. तसेच कायदेशीर बंधन नसले तरी नैतिक व सामाजिकदृष्ट्या सवलती चालू ठेवणे हेच न्यायाचे आहे. यावेळी मुख्यमंत्री म्हणून यशवंतराव चव्हाण हेच अल्पमतात होते. तरीदेखील यशवंतराव चव्हाण यांनी आपली बाजू मांडली. शेवटी पंडित जवाहरलाल नेहरू यांच्याशी अधिक चर्चा करावी असे ठरले व बैठक तहकूब झाली. पुढच्या बैठकीवेळी यशवंतराव चव्हाण यांनी पंडित नेहरू हे या सवलती चालू ठेवण्यासाठी अनुकूल असल्याचे मंत्रिमंडळाला सांगितले. नवबौद्धांना मागासवर्गीयांच्या शक्य त्या सर्व सवलती चालू ठेवण्याच्या मंत्रिमंडळाचा ऐतिहासिक निर्णय झाला. यानंतर यशवंतराव चव्हाण म्हणाले की, आज आपणाला कृतार्थ वाटते.

**शिष्यवृत्तीचा प्रश्न**

घरची आर्थिक परिस्थिती बिकट असल्याने ज्या गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना शिक्षणापासून वंचित राहावे लागते अशा मुलांना मोफत शिक्षण द्यावे यासाठी यशवंतराव चव्हाण यांनी मुख्यमंत्री पदाचा त्याग करण्याचे ठरविले. यावेळी राज्याची आर्थिक परिस्थिती बिकट असल्याने या गोष्टीस विरोध झाला. परंतु शेवटी यशवंतराव चव्हाण यांच्या दबावामुळे वार्षिक उत्पन्न 900 रुपयाच्या खाली असलेल्या आर्थिक दृष्ट्या मागास वर्गासाठी (ई. बी. सी.) मोफत शिक्षण देण्याची योजना मंजूर केली गेली.

**यशवंतराव चव्हाण यांचे आर्थिक कार्य**

यशवंतराव चव्हाण यांनी एम.आय.डी.सी.ची स्थापना करून जिल्हा व तालुका पातळीवर औद्योगिक वसाहती निर्माण केल्या. कृषी औद्योगिक संस्था स्थापन करून शेतमालावर प्रक्रिया करणाऱ्या उद्योगास प्रोत्साहित केले. महाराष्ट्र राज्यामध्ये सहकारी तत्त्वावर चालणारे साखर कारखाने, सूत गिरण्या, दूध संघ, सहकारी सोसायटी व सहकारी बँका यशवंतरावांच्या उदार औद्योगिक धोरणामुळे निर्माण झाल्या. त्यामुळे पुढील काळात महाराष्ट्रातील बेरोजगारी कमी होण्यास मदत झाली.

**यशवंतराव चव्हाण यांची ग्रंथसंपदा**

साहित्य हा यशवंतरावांच्या आत्यंतिक जिव्हाळ्याचा विषय होता. त्यांचे ग्रंथावर प्रेम होते. माता, मातृभाषा आणि मानवता याविषयी त्यांना आत्यंत आदर होता. अनेक साहित्यिक आणि विचारवंत व विविध क्षेत्रातील मान्यवर हे त्यांचे मित्र होते. महाराष्ट्राच्या उत्कर्षाचे विचार त्यांनी आपल्या भाषणांमधून मांडले आहेत. त्यांचे विचार हे महाराष्ट्राच्या आजच्या आणि उद्याच्या संदर्भात ही तंतोतंत लागू पडतात. म्हणूनच काळ उलटला तरी त्यांचे विचार अटळ व स्फूर्ती देणारे आहेत.

यशवंतराव चव्हाण यांनी भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य संस्कृती मंडळाची निर्मिती केली होती. १९७५ साली कराड येथे भरलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष म्हणून त्यांची निवड झाली होती. सह्याद्रीचे वारे, युगांतर या नावाने त्यांच्या भाषणाचे दोन संग्रह प्रसिद्ध झ ले आहेत. 'ऋणानुबंध', 'कृष्णाकाठ' हे त्यांचे आत्मचरित्र प्रसिद्ध आहेत.

यशवंतराव चव्हाण यांची साहित्यिक भाषणे व प्रासंगिक वैचारिक लेखन हे नियतकालिकातून व ग्रंथ रूपाने ही प्रसिद्ध झाली आहेत. साहित्याच्या दृष्टीने त्यांच्या भाषणांचे संकलित ग्रंथ 'सह्याद्रीचे वारे', 'भूमिका', 'शिवनेरीचे सोबती', यातून यशवंतराव चव्हाण यांच्या शब्दांचे सामर्थ्य यांसारख्या ग्रंथातील काही भाषणांमधून त्यांचे विचार, सामाजिक-राजकीय धोरण व जीवन जगण्याची उद्दिष्टे आपणास समजून येतात. २५ नोव्हेंबर १९८४ रोजी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने त्यांचे अचानक निधन झाले.

**निष्कर्ष**

सामाजिक व राजकीय कामांचा प्रचंड अवाका असलेली व ज्यांच्या कर्तृत्त्वाची पाळेमुळे सामान्य माणसांच्या आयुष्यात खोलवर रुतली आहेत असे महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री, गृहमंत्री, अर्थमंत्री, संरक्षणमंत्री व उपपंतप्रधान म्हणजे यशवंतराव चव्हाण होय.

डॉ. पंजाबराव जाधव त्यांच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल म्हणतात, "श्री. यशवंतराव चव्हाण म्हणजे लोकशाही समाजवादाचा धन्वंतरी, विशाल दृष्टिकोण असलेला समतोल बुद्धीचा राजकारणी, धुरंदर कर्तबगारीचा कुतुबमिनार, यशवंतराव म्हणजे भारतीय क्षितिजावर झळकणारा दैदीप्यमान तारा. अपूर्व आकर्षणाचा लोहचुंबक, निर्भयतेचा महामेरू, पावित्र्याचा महासागर, उत्साहाचा नायगारा व चैतन्याचा महासिंधू होय." डॉ.पंजाबरावांना शास्त्र, इतिहास व भूगोल या सर्व विषयातील उपमांचा उपयोग करून यशवंतरावांच्या व्यक्तिमत्त्वाचे वर्णन करावेसे वाटणे साहजिकच आहे आणि यातील प्रत्येक उपमा यशवंतरावांच्या बाबतीत खरी ठरली म्हणजेच सार्थ ठरली.

आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्राला वैभवशाली बनवण्यासाठी कला, क्रीडा, साहित्य, शिक्षण, सहकार व उद्योग इत्यादी क्षेत्रात अनेक क्रांतिकारी परिवर्तन घडवले व महाराष्ट्राचा विकास साधला गेला. महाराष्ट्र राज्यास पुरोगामी बनवण्यामध्ये यशवंतराव चव्हाण यांचे खूप मोठे योगदान आहे. यशवंतरावानी १ मे, १९६० ते १९ नोव्हेंबर, १९६२ या आपल्या मुख्यमंत्रीपदाच्या काळात विविध सामाजिक विकासाचे क्रांतिकारी निर्णय घेऊन त्यांवर अंमलबजावणी केली.

## संदर्भ साधने


१. व्हटकर नामदेव (१९६२), यशवंतराव चव्हाण, चंद्रकांत शेट्ये प्रकाशन मंदीर, कोल्हापूर.

२. चव्हाण रा.ना. (२०१०), यशवंतराव चव्हाण यांचे समाजकारण, रा. ना. चव्हाण प्रतिष्ठान अक्षर श्रद्धांजली, पहिली आवृत्ती, पुणे.

३. चव्हाण यशवंतराव (१९८६), ऋणानुबंध, प्रेस्टीज प्रकाशन, द्वितीय आवृत्ती, पुणे.

४. बाबर सरोजिनी (२००७), मी पाहिलेले यशवंतराव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, द्वितीय आवृत्ती, मुंबई.

५. देशमुख शिवाजीराव (२००९), यशवंतराव चव्हाण यांचे समीक्षा लेखन व भाषणे, कौशल्या पब्लिकेशन, सोलापूर.

६. साने रविकिरण व माने नीं तमा (२००९), महाराष्ट्राचे शासन आणि राजकारण, डायमंड पब्लिकेशन, पुणे.

७. भावे मधुकर (२००८), यशवंतराव ते विलासराव, मनोविकास प्रकाशन, पुणे

८. फडके य.दि., विसाव्या शतकातील महाराष्ट्र, खंड ७ व ८ संयुक्त महाराष्ट्र चळवळ १९४८ ते १९५६, विद्या प्रकाशन पुणे.

९. शानेदिवाण राजेखान, यशवंतराव चव्हाण यांची वैचारिकता, अक्षर दालन पब्लिकेशन, कोल्हापूर.

१०. शेनोलीकर व देशपांडे प्र. न. (२००९), महाराष्ट्राचा सामाजिक- सांस्कृतिक इतिहास, के-सागर पब्लिकेशन, द्वितीय आवृत्ती, पुणे.